लीलाशिंदे यांच्या समग्र बाल वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कला विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी. पदवी करीता

विषयाचा संक्षिप्त आराखडा

संशोधक

सौ. भाग्यश्री नामदेवराव रानवळकर-रोडे

एम.ए.मराठीसेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.केशव सखाराम देशमुख

प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,

भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,

स्वामी रामानंद तीर्थमराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै २०१९

लीला शिंदे यांच्या समग्र बालवाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :-

बालसाहित्य म्हणजे मोठ्या माणसांनी लहान मुलांसाठी लिहिलेले वाङ्मय या वाङ्मयात राजा-राणी, राजकन्या, पऱ्या, देवदूत, बोलणारे प्राणी, जादूगार, राक्षस आणि सग्दुनी-दुर्गुनी माणसे असतात. १९ व्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत बाल वाङ्‌:मय स्वतंत्र्यपणे लिहीलेले, स्वतंत्र्य ग्रंथरुपात नव्हते, ऋग्वेद, रामायण, महाभारत, ते बुद्ध-जैन काळापर्यंतच्या पाच सहा हजार वर्षातल्या कथा-वाङ्‌:मयात दर्जेदार प्राणी कथा कल्पित कथा, अभ्दुतभुत कथा, लोक कथा, पंचतंत्र हितोपदेश कथा, अशा वेळोवेळी भर पडत जाऊन भारतीय कथा वाङ्मय खुप समृद्ध झाले होते. या सर्व कथांचा हेतू सर्व सामान्य लोकांना मनोरंजनातून नीती शिक्षण देण्याचा होता.

बाल साहित्याचा खूप मोठा आणि संपन्न असा खजिना आहे. या विपुल खजिन्यातून मुलांना सांगण्याजोग्या कथा, कहाण्या, कविता आणि नाटूकल्या नेमक्या निवडून मौखिक म्हणजेच कथित बालवाङ्‌:मयाचे पारंपारिक स्वतंत्र दालन घरोघरीच्या वयस्कर स्त्रियांनी मोठ्या कौशल्याने तयार केले होते. मुलांचे मन कोवळे भावनाशील व संस्कारक्षम असल्यामुळे यातल्या बऱ्याच कथा मुलांना अधिक उपयुक्त होण्यासारख्या होत्या. मुलांना भावनाऱ्या होत्या.

बाल साहित्याला समृद्ध करण्याचे श्रेय साने गुरूजी,वि.स.खांडेकर, मंगेश पाडगांवकर, विं.दा. करंदीकर, शांता शेळके, प्र.के. अत्रे, इंदिरा तेलंग, गो.नी. दांडेकर, भा.रा. भागवत, ना.धो. ताम्हनकर, कुमुदिनी रांगणेकर, मालती दांडेकर, सुधा करमरकर,ल.म. कडू, बाबा भांड, अनंत काणेकर, अनिल अवचट, शैलजा काळे, इंदुमती शिरवाडकर, गोपीनाथ तळवलकर, ताराबाई मोडक, कुसुमाग्रज, अनुताई वाघ, लीलावती भागवत, संजीवनी मराठे इ. नावे घेता येतील.

विषय निवडीची भूमिका

प्रस्तुत विषयावर संशोधन करत असतांना बाल साहित्यामुळे बालकांच्या जडण-घडणीवर कशा प्रकारे परिणाम होतो. हे समजण्यास मदत होईल. काळाची नेमकी गरज म्हणून संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी बाल साहित्याचा अभ्यास महत्वपूर्ण वाटतो. त्याच बरोबर बालक बालकांची मानसिकता, बालकांचे विश्व यांचा अभ्यास करण्यासाठी हा विषय मौलिक वाटतो. आजच्या तंत्रज्ञान आणि क्रांतीच्या युगात बालकांचे बालपण हिरावून घेतले आहे, मराठी बाल साहित्यामध्ये असे नवीन लेखक दिसून येतात ज्यांनी बाल साहित्याला संजीवनी प्राप्त करुन दिली.

लीला शिंदे यांनी बाल साहित्याच्या माध्यमातुन बाल विकासाला बळकटी दिली. त्याच बरोबर मराठी बाल साहित्य समृद्ध केले.

उद्दिष्ट्ये :-

१. लीला शिंदे यांच्या बालकवितांचा समग्र अभ्यास करणे
२. लीला शिंदे यांच्या बालकथांचा अभ्यास करणे
३. लीला शिंदे यांच्या बालकादंबरीका चा अभ्यास करणे
४. लीला शिंदे यांच्या नाटुकलीचा अभ्यास करणे.
५. लीला शिंदे यांच्या अणुवादित बालसाहित्याचा अभ्यास करणे.

गृहितके :-

प्रस्तुत विषयाचे महत्व बालकांचे मनोविज्ञान तसेच वाङ्:मयीन दृष्टीकोणातून लीला शिंदे यांच्या बालकविता, बालकथा, ललित, नाटूकली, बालकादंबरीका या संशोधनात अंर्तभूत आहेत.

१. लीला शिंदे यांच्या कविता बाल मनाला सहज ओढ लावेल अशा कविता आहेत.
२. लीला शिंदे यांच्या कविते मध्ये रंगी-बेरंगी दुनियेची सफर पहावयास मिळते.
३. लीला शिंदे यांच्या कवितेत डोंगरदऱ्यातील झऱ्यांचा निर्मळपणा आणि माणसातला ढोंगीपणा हा विरोधाभासही दिसून येतो.

४. लीला शिंदे यांच्या बाल कथा म्हणजे मुलां मध्ये असलेला संमजसपणा, संवेदनशीलता, निरागसता, आनंदीवृत्ती इ. चा सुंदर आविष्कार आहे.
५. लीला शिंदे यांच्या साहित्यात निसर्ग आणि माणूस यांच्या हिरवळीच सुख दिसून येते.
६. लीला शिंदे यांच्या बाल साहित्यातून जिवलगपणाचे कंगोरे हे छोट्या-छोट्या गोष्टीत दिसून येतात.

संशोधनपद्धती :-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी विश्लेषणात्मक, समीक्षात्मक तसेच वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला जाईल.

संशोधनपद्धतीची साधने

प्रस्तुत संशोधन अभ्यास पद्धतीसाठी लीला शिंदे यांच्या समग्र बाल वाङ्ःमयाबरोबरच इतर समीक्षात्मक ग्रंथ संशोधन ग्रंथ नियतकालिके इत्यादीचा वापर करण्यात येईल.

अनुसंधानाची रुपरेखा

प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करत असतांना संशोधन अधिक सुलभ सोपे व्हावे म्हणून सहा प्रकरणामध्ये संशोधनाची विभागणी केली आहे.

प्रकरण १ ले : मराठी बालवाङ्मयाचे स्वरूप :-

मराठी बालसाहित्याचा खूप मोठा आणि खूप संपन्न असा खजिना आहे. बालसाहित्य संकल्पना ही जागतिक स्तरावरची असली तरी भारतामध्ये आणि महाराष्ट्रात बालमानसशास्त्र आणि बालसाहित्य यांचा गांभीर्याने विचार सुरु होण्यास मादाम मॉन्टेसरी यांची १९४४ ची पुणे भेट कारणीभूत आहे असे म्हणतात.

बालसाहित्याला पहिले मुद्रित स्वरुप १८०६ साली बालबोध व मुक्तावली च्या रुपाने मिळाले इसापनीती, पंचतंत्र, हितोपदेश अशी पुस्तके थेट उपदेश करणाऱ्या बोधकथा होत्या. १८९१-१९०० हा मराठी बालसाहित्याचा विकासकाळ १८४६ मध्ये मेजर ट्रॉमस कॅंडी १८०४-६६

ह्यांची मराठी ट्रॉन्सलेटर व रेफरी म्हणून नेमणूक झाल्यानंतर त्यांने मराठी पुस्तकांची पोथी पद्धतीची प्रौढ भाषा टाळण्याचे प्रयत्न केले इंग्रजी पद्धतीची तसेच व्याकरण दोषयुक्त वाक्य रचना काढून टाकण्याचा कटाक्ष ठेवला. बालवाङ्‌मयाच्या दृष्टीने हे धोरण उपयुक्त ठरले विनायक कोंडदेव ओक व हरिकृष्ण दामले ह्यांची ह्या धोरणास मदत झाली. विनायक कोंडदेव ओक ह्यांनी कँडीच्या धोरणानुसार शालेय पुस्तके लिहिली. त्यांनी मुलांसाठी 'बालबोध' हे मासिक काढून त्यातून सहज व सोप्या भाषेत चरित्रे, कविता, निबंध इ. विविध प्रकारचे लेखन केले. खऱ्या अर्थाने बालवाङ्‌मयाचा पाया त्यांनी घातला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

प्रकरण २ रे :- लीला शिंदे : व्यक्ती आणि वाङ्मय :-

बालकुमार यांच्यासाठी लेखन करणाऱ्या आणि लेखन करत असलेल्या लीला शिंदे यांचे लेखन सर्वांच्या पसंतीस उतरेल असंच सुलभ, सोपे, सुंदर आहे. त्यांच्या लेखनाची हातोटी सर्व वयोगटातील वाचकांना खिळवून ठेवणारी, आपल्यात सामावून घेणारी, रममाण करणारी म्हणूनच रम्य अशी आहे. बालमनाला ते फार आवडतं त्यांच्या आवडीचं मुलांना मिळाल की मुलांना स्वर्ग ही ढेंगणा होतो.

लीला फकिरराव शिंदे यांचा जन्म २३ ऑगस्ट १९५१ साली झाला एम.ए.(समाजशास्त्र) विद्यापीठात १९६२ साली सर्वतृतीय आल्या लीला शिंदे यांनी समाजशास्त्र विभाग, वसंतराव नाईक महाविद्यालय औरंगाबाद येथे ज्ञानदानाच कार्य केले. त्यांच्या एकूण आठ बालकविता प्रसिद्ध आहेत. 'या मुलांनो या' या कवितासंग्रहास महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार मिळालेला आहे. बालकथा बाललिलत, बालनाटूकली, बालकादंबरीका, अनुवादित लेखन इ. वाङमय प्रकाराचे त्यांनी लेखन केले.

प्रकरण ३ रे :- लीला शिंदे यांचे बालकवितालेखन

लीला शिंदे यांचे बालकविता लेखन बालमनाला सहज ओढ लागावी अशा सुंदर प्रकारच्या रचना आहेत. सुलभ, सोप्या शब्दांच्या मदतीने चित्रमय विश्व उभारुन मुला मुलींना आनंदाच्या वातावरणात घेऊन जाण्याची त्यांची हातोटी अकृत्रीम आहे. आनंद देण घेण असं सर्व मुलांना फार

आवडत आनंदी मुलाचा आनंद पालकाच्याही आनंदाचा विषय असतो. आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे अशाच प्रकारचं हे काव्य लेखन आहे.

लीलाताई शिंदे यांच्या बालकवितेत ढगांची सुंदर सहल आहे. अचानक धो-धो पडणारा पाऊस आहे. त्याच बरोबर डोंगरातील झऱ्यांचा निर्मळपणा आणि माणसातला ढोंगीपणा हा विरोधाभास ही दिसून येतो. लहान मुलांची दुनिया अतिशय रंगीबेरंगी करण्यात आली आहे. ‘या मुलांनो या’ ह्या त्यांच्या पहिल्या कविता संग्रहास उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार मिळालेला आहे. त्यांच्या कविता म्हणजे छोट्यांना एक मेजवानीच आहे.

प्रकरण ४ थे :- लीला शिंदे यांचे बालकथालेखन

लीला शिंदे यांच्या बालकथा संग्रहात मुलांमध्ये असलेल्या समंजसपणा, संवेदनशीलता, निरागसता, आनंदी वृत्ती आणि लहानग्या मनात दडलेल्या मोठेपणाचा सुंदर अविष्कार आहे. मुलांच्या मनात वाचनाची आवड निर्माण होईल अशाच शैलीतल्या त्यांच्या बालकथा आहेत. ‘ चार गोष्टी आवडीच्या’ या बालकथा संग्रहाला महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट वाङ:मय पुरस्कार मिळालेला आहे. त्यांच्या बालकथा कुतूहल वाढवणाऱ्या आहेत.

प्रकरण ५ वे : लीला शिंदे यांचे बालकादंबरी लेखन आणि अनुवादित वाङ्मय

लीला शिंदे यांचे लेखन साधे, सरळ असल्याने, सुस्वभावी म्हणजेच ऱ्हदयाला भिडणारे आहे. लेखनातली हार्दिकता फार ऱ्हदयस्पर्शी आहे. जिवलगपणाचे छोटे-मोठे कंगोरे, किती छान शैलीत रेखाटता येतात त्या लेखनाचा जणू दाखलाच म्हणजे त्यांचे लेखन होय जिनी आणि ‘कडू नावाची गोड मुलगी’ ह्या दोन बालकादंबरीका आहेत.

लीला शिंदे ह्यांनी जगप्रसिद्ध परीकथा, मजेदार कथा आणि तेनालीरामाच्या गोष्टी यांचे अनुवाद सुद्धा केले आहेत.मुलांच्या बौद्धिक, विकासात चालणा देणाऱ्या ह्या गोष्टी आहेत.

या प्रकरणात आपण त्यांच्या बालकादंबरी लेखनाचा आणि अनुवादित वाङ्‌मयाचा अभ्यास करणार आहोत.

प्रकरण ६ वे : निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणात संशोधन कार्यामध्ये संशोधन विषयांच्या अनुषंगाने जे निष्कर्ष प्राप्त होतील त्या प्रमुख निष्कर्षाची मांडणी करण्यात येईल.

अ. परिशिष्ट

कवितासंग्रह :-

या मुलांनो या	: लीला शिंदे :	साकेत प्रकाशन प्रा.लि. ११५ गांधीनगर औरंगाबाद, प्र. आ. १९९२ पृ.क्र. २४ मूल्य-५
खेळीमेळी	: लीला शिंदे :	साकेत प्रकाशन प्रा.लि. ११५ गांधीनगर औरंगाबाद, प्र. आ. १९९४ पृ.क्र. १६ मूल्य-४
रंगीबेरंगी	: लीला शिंदे :	परिमल प्रकाशन, खडकेश्वर औरंगाबाद, प्र. आ. १० जून १९९८ पृ.क्र. ३२ मूल्य-२०
आनंदाचा गाव	: लीला शिंदे :	प्रतिभास प्रकाशन, परभणी प्र. आ. फेब्रु. २००६ पृ.क्र. ४८ मूल्य-४५
दिवस हा नवा नवा	: लीला शिंदे :	साक्षात प्रकाशन, खिवंसरा पार्क, गारखेडा, औरंगाबाद. प्र. आ. १ मार्च २०१२ पृ.क्र. २४ मूल्य-२०
च चॉकलेटचा	: लीला शिंदे :	स्पर्श प्रकाशन, पुणे प्र. आ. १८ जुलै २०१२ पृ.क्र.३० मूल्य-३२

बालकथा :-

मित्र जीवाचा खरा : लीला शिंदे : साकेत प्रकाशन
प्रा.लि. ११५ गांधीनगर औरंगाबाद,
प्र. आ. १९९७ पृ.क्र. १६ मूल्य-८

चार गोष्टी आवडीच्या : लीला शिंदे : इसाप प्रकाशन, नांदेड
प्र.आ. २६ मार्च २००१ पृ.क्र.३२ मूल्य - २५

छोट्याच मोठं जग : लीला शिंदे : अजब प्रकाशन, कोल्हापुर
प्र.आ. १० पृ.क्र.३२ मूल्य - ३०

मुलं ती फुलं : लीला शिंदे : सुरभी प्रकाशन, औरंगाबाद
प्र.आ.१३ एप्रिल २००२ पृ.क्र.२४ मूल्य -२०

ज्ञानूचं गाव : लीला शिंदे : कॉन्टीनेंन्टल प्रकाशन, पुणे,
प्र.आ.०१ जून २०१९ पृ.क्र.५६ मूल्य -७०

बाल कादंबरीका :

कडू नावाची गोड मुलगी : लीला शिंदे : रजत प्रकाशन औरंगाबाद
प्र.आ.१० डिसे.२०१७ पृ.क्र.३२ मूल्य -७०

अनुवादित

जग प्रसिद्ध परिकथा : अनुवाद लीला शिंदे : साकेत प्रकाशन
प्रा.लि. ११५ गांधीनगर औरंगाबाद,
प्र.आ. २०११ पृ.क्र. ५२ मूल्य-५०

तेनालीरामा च्या गोष्टी : अनुवाद लीला शिंदे : साकेत प्रकाशन
प्रा.लि. ११५ गांधीनगर औरंगाबाद,
प्र.आ. २०१४ पृ.क्र. ८० मूल्य-१००

मजेदार कथा : अनुवाद लीला शिंदे : साकेत प्रकाशन
प्रा.लि. ११५ गांधीनगर औरंगाबाद,
प्र.आ.२०१३ पृ.क्र. ६२ मूल्य-६०

ललित

पंख येती पक्ष्याला : लीला शिंदे : सुरेश एजन्सी पुणे
प्रा.लि. ११५ गांधीनगर औरंगाबाद,
प्र.आ.२००३ पृ.क्र. ३९ मूल्य-३०

संदर्भसुची :-

१. मराठी बाल साहित्य विचार आणि दर्शन	डॉ. लीला दीक्षित चेतक बुकस् पृ.क्र. ३०० मूल्य-३२५
२. बाल साहित्य आकलन आणि समीक्षा :	प्रा. विद्या सुर्वे, स्पर्श प्रकाशन, पुणे प्र.आ. ऑक्टो. २०१५ मूल्य २२० पृ.क्र.१६०
३. मनातलं आभाळ	: डॉ. वासुदेव मुलाटे स्वरुप प्रकाशन, पृ.क्र. १६४ मूल्य १८०
४. साहित्य रुप आणि स्वरुप	डॉ. वासुदेव मुलाटे, कैलास पब्लिकेशन्स,
५. पावसा आधीचा पाऊस	:शांता शेळके मेहता पब्लिशिंग हाऊस,
६. शब्दगंध	निर्मलकुमार सूर्यवंशी निर्मल प्रकाशन नांदेड.
७. कविता आणि प्रतिमा	डॉ. सुधीर रसाळ ,मौज प्रकाशन गृह
८. क कवितेचा	डॉ. दासू वैद्य पॉप्युलर प्रकाशन, २००९
९. भुर्र (बालकुमार वाङ्मय)	डॉ. दासू वैद्य साकेत प्रकाशन प्रा.लि. औरंगाबाद

Bhagyashri

संशोधक

सौ. भाग्यश्री नामदेवराव रानवळकर-रोडे

एम.ए.मराठी सेट

मार्गदर्शक

२७/७/१९

प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,

भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डॉ. केशव सखाराम देशमुख

प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ,

नांदेड (महाराष्ट्र)